Copy

क्रमांक : आरसीटी ४१८१/११९७२६/६७५/ई-७.

महसूल व वन विभाग, मंत्रालय,
मुंबई-३२. दिनांक २४.११.८१.

प्रति,

जिल्हाधिकारी बीड,
बीड.

विषय :- चतुर्थश्रेणीतून निवृत्त झालेल्या अगर निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मुलास नेमणूक देण्याबाबत.

संदर्भ :- उपरोक्त विषयासंबंधीचे आपले पत्र क्रमांक आरसीटी डेस्क-१-ईएसटीएन-९६५२-८१ कृपया पहावे.

२. आपल्या संदर्भांकीत पत्रात उपस्थित केलेल्या मुद्यांचे बाबतीत खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईटीआर. १०८०/८१९/१२ दिनांक १४.४.८१ मधील आदेश दिनांक १४.४.८१ पूर्वी निवृत्त झालेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनाही लागू आहेत.

२) विभागांनी /कार्यालयांनी त्यांच्याकडे चतुर्थश्रेणीतील पद रिक्त असेल व अर्जदार चतुर्थश्रेणीतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याचा मुलगा किंवा अविवाहीत मुलगी असेल व तो किंवा ती दिनांक १४.४.८१ च्या परिपत्रकात दिलेल्या सर्व अटींची पूर्तता करीत असेल तरच त्याच्या किंवा तिच्या अर्जाचा विचार करावा.

३) दिनांक १४.४.८१ च्या परिपत्रकातील आदेशानुसार चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या फक्त एका मुलाला किंवा अविवाहीत मुलीला फक्त चतुर्थश्रेणीतील रिक्त पदावर नेमणूक देता येईल.

४) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याचा एक मुलगा आधीच शासन सेवेत असेल तर दुसऱ्या मुलास या आदेशांचा फायदा देता येणार नाही.

५) निवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचारी ज्या कार्यालयात होता त्या कार्यालयात जर रिक्त पद नसेल तर संबंधित अर्जदारांनी ज्या ज्या कार्यालयात चतुर्थश्रेणीतील पद रिक्त असेल अशा कार्यालयांच्या प्रमुखाकडे स्वतःची संपूर्ण माहिती देऊन अर्ज करावा.

६) चतुर्थवर्ग कर्मचाऱ्याचा मुलगा किंवा मुलगी शैक्षणिकदृष्ट्या वर्ग-३ मधील पदासाठी पात्र असला/असली तरी त्याला/तिला वर्ग-३ मधील पदावर नियुक्ती देता येणार नाही. दिनांक १४.४.८१ चे आदेश वर्ग-३ च्या पदांना लागू नाहीत.

( म. ना. हुडे )
अवर सचिव, महसूल व वन विभाग

१) प्रत, जिल्हाधिकारी बीड यांच्या संदर्भाधीन पत्राच्या प्रतीसहीत -
सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी / सर्व आयुक्त
यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

२) प्रत सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १२) कडे माहितीसाठी रवाना

No.RO.Desk.I.Edl.9663-81,
Office of the Collector, Beed.
Dated - 8.9.1981.

(208)

To

The Secretary to Government,
Revenue & Forests Department,
Mantralaya, Bombay-32.

Subject:- Employment to the sons of retired or to be retired peons - providing of-

Sir,

Kindly peruse Government Circular, G.A.D.No.ATR.1080-819/12 dated 14.4.1981 throughwhich it has been informed that the sons of retired peons, peons to be retired within one year may be provided employment on Class-IV and not come through the Employment Exchange on the conditions mentioned therein.

2) This office is considering the cases of such persons but is observed that the sons of retired ~~peons~~ peons ie. the peons who have been retired before long back are also submitting appli--cations for appointment as peon and it is very difficult to provide employment to each and every applicant for want vacancies.

3) It is therefore requested kindly to guide this office as to whether the Government orders referred to above may be given effect from the date of issue of Govt. orders or past cases may also be considered and whether they should be given employment as Class-IV in the same Department or in any other Department of Government.

4) Early orders in the matter are requested.

Yours faithfully,
sd/-
for Collector, Beed.

O.C.signed by Collector.

Copy submitted to the Secretary to Government, General Administration Department, Mantralaya, Bombay-32 with similar request.

Copy submitted to the Commissioner, Aurangabad with similar request.

sd/-
for Collector, Beed.